**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय, लेखा व कोषागारे**
**नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, संगणक कक्ष, मादाम कामा मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.**
दूरध्वनीक्रमांक:- ०२२-२२०२९१२८ email id: jdit-dat@mah.gov.in


जा.क्र. - संचालनालय ले व को/ संगणक शाखा/TreasuryNet/२०२५/ ९२९ दिनांक: २६/०५/२०२५

# परिपत्रक

**विषय – कमी जोखमीच्या इलेक्ट्रॉनिक देयकांवरील इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरींची संख्या कमी करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग पत्र क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र. ९८/ २०२२/कोषा प्रशा ५, दिनांक २१ नोव्हेंबर, २०२२ नुसार राज्यातील सर्व जिल्हा कोषागारे आणि सर्व उप कोषागारे यांच्या क्षेत्रातील सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून सादर होणारी वीज, दूरध्वनी आणि पाणी आकार (Electricity, Telephone & Water Charges) यांच्या संदर्भातील कमी जोखमीची देयके इलेक्ट्रॉनिक e-Bill स्वरुपामध्ये सादर होत आहेत. या देयकांवर संबंधित आहरण अधिकाऱ्यांची e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी करण्यात येते.जिल्हा कोषागारे आणि उप कोषागारे येथे या इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील देयकांवर TreasuryNet प्रणालीमध्ये प्रक्रिया आणि तपासणी करण्यात येत असताना संबंधित देयक ज्या कर्मचाऱ्यांच्या आणि पर्यवेक्षक तसेच अधिकारी यांच्या संगणकीय लॉगीन मधून तपासले आणि प्रक्रिया केले जात असते, त्या सर्व कर्मचारी, पर्यवेक्षक आणि अधिकारी यांच्या e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी सदर e-Bill वर नोंदविण्यात येत असते.

सद्यस्थितीत जिल्हा कोषागारांमध्ये सादर होत असलेल्या या कमी जोखमीच्या देयकांवर जिल्हा कोषागारातील अधिकारी व कर्मचा-यांच्या e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरींची संख्या पुढीलप्रमाणे ०५ (पाच स्वाक्षरी) इतकी आहे.

१.Audit Operator - देयक तपासणी करताना e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी

२.Audit ATO - देयक पारित करताना e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी

३.Payment ATO - देयकाची प्रदान प्रक्रिया करताना e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी

४.Payment Supervisor - देयकाची Advice तयार करताना e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी

५.Payment ATO - जिल्हा कोषागारामध्ये पारित होत असलेल्या या कमी जोखमीच्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक देयकाचे संदर्भात PDF स्वरुपातील Treasury Document तयार होत असते. या Treasury Document वर देखील e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी करण्यात येते.

तसेच उप कोषागारांमध्ये प्रक्रिया आणि तपासणी करण्यात येत असलेल्या सदर देयकांवर केवळ Audit Operator या एकाच कर्मचा-याची e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी होत असते.

Scanned with OKEN Scanner

या सर्व इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरींची प्रक्रिया पूर्ण करण्यामध्ये बराच वेळ लागत असल्याचे संचालनालयाच्या निदर्शनास आले आहे. कमी जोखमीची देयके त्वरित प्रक्रिया करून त्यांची प्रदाने लवकरात लवकर होणाच्या दृष्टीने या इलेक्ट्रॉनिक स्वरुपाच्या देयकांवरील कोषागार अधिकारी व कर्मचारी यांच्या e-Hastakshar द्वारे होत असलेल्या इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरींची संख्या कमी करण्याची बाब संचालनालयाच्या विचाराधीन होती.

**तद्नुसार खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.**

१) प्रथम टप्प्यामध्ये जिल्हा कोषागार येथे सादर होत असलेल्या वीज, दूरध्वनी आणि पाणी आकार (Electricity, Telephone & Water Charges) यांच्या संदर्भातील कमी जोखमीची देयकांवर TreasuryNet प्रणालीमध्ये प्रक्रिया करताना अपर कोषागार अधिकारी (लेखा परीक्षा) आणि अपर कोषागार अधिकारी (प्रदान) या दोन अधिका-यांची e-Hastakshar सुविधेद्वारे इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी नोंदविण्यात येईल.

२) सदर देयकांवर जिल्हा कोषागारातील ज्या उर्वरित कर्मचारी आणि पर्यवेक्षक यांच्या संगणकीय लॉगीन मधून प्रक्रिया पूर्ण होत असेल, त्यांच्या e-Hastakshar स्वरुपातील इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी न करता त्यांचा संगणकीय लॉग जतन करण्यात येईल.

३) उप कोषागार येथील या संदर्भातील कार्यपद्धती पूर्वीप्रमाणेच कायम राहील.

४) सदर बदल हे दिनांक **१ जून, २०२५** पासून लागू करण्यात येतील.

५) या सुधारणेचा पुढील भाग म्हणून दुस-या टप्प्यामध्ये, जिल्हा कोषागारामध्ये आणि उप कोषागारामध्ये पारित होत असलेल्या या कमी जोखमीच्या प्रत्येक इलेक्ट्रॉनिक देयकाचे संदर्भात PDF स्वरुपातील Treasury Document तयार करण्याऐवजी, मासिक लेख्यांची पहिली यादी (दिनांक ०१ ते १५ या दरम्यान) आणि दुसरी यादी (दिनांक १६ ते ३० किंवा ३१ या दरम्यान) या कालावधीमध्ये पारित झालेल्या सर्व कमी जोखमीच्या इलेक्ट्रॉनिक देयकांच्या संदर्भात एकत्रित स्वरुपात पाक्षिक Treasury Document म्हणजेच Fortnightly Consolidated Treasury Document तयार करण्यात येईल. या एकत्रित स्वरुपाच्या पाक्षिक Treasury Document वर जिल्हा कोषागारामध्ये अपर कोषागार अधिकारी (प्रदान) आणि उप कोषागारामध्ये Audit Operator यांची e-Hastakshar स्वरुपातील इलेक्ट्रॉनिक स्वाक्षरी करण्यात येईल.

६) दुसऱ्या टप्प्यातील उपरोक्त बदल हे दिनांक **१ जुलै २०२५** पासून लागू करण्यात येतील

करीता आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना

(दीपा देशपांडे)
संचालक, लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :

**मा. प्रधान सचिव (ले व को), वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई.**

प्रत: आवश्यक कार्यवाहीस्तव

१. विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे ( सर्व)*
२. अधिदान व लेखा अधिकारी,कार्यालय, मुंबई.*
३. वरिष्ठ कोषागार अधिकारी (सर्व) **
४. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)**
५. उपकोषागार अधिकारी (सर्व)**
६. सहायक संचालक, ट्रेझरीनेट *

Scanned with OKEN Scanner

५३१५

७. कोषागार व्यवस्थापन शाखा (TM)*

८. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे *

*ई-मेलद्वारे निर्गमित

** विभागीय सहसंचालक, लेखा व कोषागारे यांचेमार्फत अधिनस्त कार्यालयांना अवगत करण्यास्तव

**टिप: सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर Circulars and Orders - IT & Reforms Circulars या Tab अंतर्गत उपलब्ध आहे.**

Scanned with OKEN Scanner